Offers will be opened at 5 pm on 07th October 2024 at Surajwadi, 152, Panjarapole Road, Mumbai-400 004, so all offerers should be present in the office of the Trust. Any deviation from the prescribed letter of offer or Conditional offers or incomplete form shall not be considered and shall result in automatic cancellation. The Trustees reserve their right to accept or reject the offers with or without citing any reasons for the same. The sale of the said property and or its rights will be subject to the sanction by the Charity Commissioner, Maharashtra State, Mumbai as per Section 36(1) (a) of the Bombay Public Trusts Act, 1950.

Mumbai
Dated: 06 September 2024

Mr. Dharmendra P. Vakharia, Trustee
The Harjivan Vassonji Charitable Trust

# AKAR AUTO INDUSTRIES LIMITED

**Regd. Office:** 304, Abhay Steel House, Carnac Bunder, Baroda Street, Mumbai - 400009. (India)
**Tel:** (O22)23481083, Fax: 91-22-23483887,
**Corp Office:** E-5, MIDC, Waluj, Aurangabad (chh.Sambhaji Nagar) - 431136 (M.S) India
**Tel:** (0240)6647230, **Fax:** 91-240-2554640
**Website:** https://akarauto.com **Email:** corporate@akartoolsltd.com
**CIN No. L29220MH1989PLC052305**

**NOTICE FOR 35TH ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

Notice is hereby given that the 35th Annual General Meeting ("AGM") of Akar Auto Industries Limited will be held on Monday, 30th September, 2024 at 11.30 a.m. IST, through Video conferencing ('VC') / Other Audio Visual Means ('OAVM') to transact the business set out in the Notice of the AGM. The AGM will be convened in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013 and the Rules made thereunder ("the Act"), provisions of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulation, 2015 ("Listing Regulations") read with all applicable circulars on the matter issued by Ministry of Corporate Affairs, Government of India and Securities and Exchange Board of India.

In compliance with relevant circulars, the Company has sent Notice of AGM and Annual Report only by electronic mode on 05th September, 2024, to all the members whose email addresses are registered with the Depository Participants or the Company. The Notice of the AGM and Annual Report is also available on the website of the Company at https://akarauto.com and on the website of the Stock Exchange i.e. BSE Limited at www.bseindia.com and on the website of Bigshare Services Private Limited at www.bigshareonline.com.

**REMOTE E-VOTING AND E-VOTING AT THE AGM**

Pursuant to Section 108 of the Companies Act, 2013 read with Rule 20 of Companies (Management and Administration) Rules, 2014, Regulation 44 of Listing Regulations and Secretarial Standard on General Meetings, each as amended, the Company has engaged services of Bigshare for providing remote e-voting facility prior to AGM ('Remote e-voting') and e-voting at the AGM to all its members to cast their vote on all the resolutions set out in the Notice of AGM.

| | |
|---|---|
| Cut-off date for e-voting | Friday, 20th September, 2024 |
| Commencement date of Remote e-voting | 9.00 a.m. (IST) on Friday, 27th September, 2024 |
| Conclusion date of Remote e-voting | 5.00 p.m. (IST) on Sunday, 29th September, 2024 |
| E-voting during AGM | From commencement of AGM till 15 minutes from the conclusion of AGM |

Members who will be present at the AGM through VC/OAVM and who have not cast their vote by Remote e-voting, will be eligible to exercise their right to vote during the AGM. Members who have cast their vote by Remote e-voting prior to AGM may also attend and participate in the AGM but shall not be entitled to cast their vote again.

Accordingly, members may cast their votes through Remote e-voting or e-voting at the AGM. Once the vote on a resolution is cast by the member, he/she shall not be allowed to change it subsequently.

The Company has appointed Mr. Nitin Sharma, Practicing Company Secretary (COP No. 9761) to act as scrutinizer for monitoring remote e-voting process and e-voting at the AGM in fair and transparent manner. The results of e-voting shall be declared within 2 working days from conclusion of the AGM of the Company. The results declared along with the scrutinizers report shall be communicated to the stock exchange and will be placed on the website of the Company at https://akarauto.com and on the website of Bigshare at www.Bigshareonline.com. and shall also be placed on the notice board of the Company in accordance with the Secretarial Standards.

Any person who acquires shares of the Company and becomes a member of the Company after dispatch of the Notice and holds the shares as of cut-off date i.e. Friday, September 20, 2024, may follow the procedure for remote e-voting as enumerated in detail in the Notice.

Members are requested to carefully read all the notes set out in the Notice of the AGM and in particular, instructions for joining the AGM, manner of casting vote through remote e-voting or through e-voting during AGM.

Members who would like to express their views/ask questions during the AGM may register themselves as a speaker by sending their request in advance on or before Friday, September 20, 2024 mentioning their name, demat account number / folio number, email id, mobile number at corporate@akartoolsltd.com. Only those Members who have registered themselves as a speaker will be allowed to express their views / ask questions during the AGM.

Helpdesk for Individual Shareholders holding securities in Demat mode for any technical issues related to login through Depository i.e. CDSL and NSDL

| Login type | Helpdesk details |
|---|---|
| Individual Shareholders holding securities in Demat mode with CDSL | Members facing any technical issue in login can contact CDSL helpdesk by sending a request at helpdesk.evoting@cdslindia.com or contact at 022- 23058738 and 22-23058542-43 |
| Individual Shareholders holding securities in Demat mode with NSDL | Members facing any technical issue in login can contact NSDL helpdesk by sending a request at evoting@nsdl.co.in or call at toll free no.: 1800 1020 990 and 1800 22 44 30 |

In case shareholders/ investor have any queries regarding E-voting, you may refer the Frequently Asked Questions ('FAQs') and i-Vote e-Voting module available at https://ivote.bigshareonline.com under download section or you can email us to ivote@bigshareonline.com or call us at: 1800 22 54 22.

**For Akar Auto Industries Limited**
**Sd/-**
**Radhyeshyam Rathi**
**(Company Secretary & Compliance Officer)**

**Place: Chh. Sambhaji Nagar (Aurangabad)**
**Date: 06th September 2024**

# पॉड टॅक्सी प्रकल्पाला ‘एमएमआरडीए’कडून ग्रीन सिग्नल



**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

मुंबईत पहिला पॉड टॅक्सी प्रकल्प उभारण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. ‘मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा’च्या (एमएमआरडीए) मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २८२व्या कार्यकारी समिती बैठकीत ‘मेसर्स साई ग्रीन मोबिलिटी प्रायव्हेट लिमिटेड’च्या नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे.

या कंपनीने फर्मने ‘मेसर्स अल्ट्रा पीआरटी’ या कंपनीसोबत भागीदारी केली आहे. या कंपनीने हीथ्रो विमानतळ, लंडन येथे कार्यरत पॉड टॅक्सी प्रणालीची निर्माती आहे. बीकेसी या बिझनेस डिस्ट्रिक्टमध्ये दररोज प्रवास करणाऱ्या चार ते सहा लाख प्रवाशांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी हा प्रकल्प बीकेसीमध्ये उभारण्यात येणार आहे.

डिझाईन, अभियांत्रिकी, विकास, बांधकाम, चाचणी, कमिशनिंग आणि ऑपरेशन आणि देखभाल यासाठी संबंधित कंपनी काम करेल. पॉड टॅक्सी प्रणाली, पूर्णपणे स्वायत्त आणि प्रत्येक १५ ते ३० सेकंदांच्या वारंवारतेने कार्य करण्यास सक्षम असल्याने बीकेसी ते वांद्रे आणि कुर्ला उपनगरी स्थानकांना जोडणाऱ्या अरुंद रस्त्यांसाठी आदर्श सार्वजनिक वाहतूक प्रणाली ठरेल, अशी ‘एमएमआरडीए’ला अपेक्षा आहे.

**पॉड टॅक्सीचा दर**

पॉड टॅक्सीचे भाडे सध्याच्या ऑटो आणि बस वापरकर्त्यांमध्ये केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे काळजीपूर्वक अंतिम केले गेले आहे. सध्या प्रवासी ऑटोद्वारे मीटरने १५.३३ रुपये प्रतिकिमी आणि वांद्रे किंवा कुर्ला येथून बीकेसीला प्रवास करण्यासाठी प्रतिप्रवासी ऑटो शेअर करण्यासाठी ३० ते ४० रुपये इतके आहे. त्याचप्रमाणे टॅक्सी वापरकर्ते १८.६७ रुपये प्रतिकिमी, तर ‘ओला’ आणि ‘उबेर’ चालक अनेकदा डायनॅमिक दर आकारतात. हा दर स्थानकांपासून बीकेसीपर्यंतच्या दोन ते तीन किमीच्या छोट्या प्रवासासाठी ८० ते १०० रुपये इतका आहे. सर्वेक्षणातून असे दिसून आले की, अंदाजे ७० टक्के ऑटो वापरकर्ते आणि ३६ टक्के बस वापरकर्ते पॉड टॅक्सी सेवेसाठी २१ रुपये प्रतिकिमी भाड्याची शिफारस केली. महागाई आणि ऑपरेशनल खर्चासाठी चार टक्के वार्षिक वाढीसह २१ रुपये प्रतिकिमी दर प्रकल्पाच्या आधीच्या टप्प्यात ‘एमएमआरडीए’ सूचित करणार आहे.

> **वाहतुककोंडीही कमी होणार**
>
> बीकेसीमधील पॉड टॅक्सी प्रकल्प हा मुंबईच्या सर्वात व्यस्त व्यावसायिक केंद्राची गतिशीलता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. ही प्रणाली केवळ लास्ट माईल कनेक्टिव्हिटी देणार नाही, तर वाहतुककोंडीही कमी करणार आहे. यामुळे बीकेसीत दैनंदिन प्रवाशांसाठी आधुनिक, कार्यक्षम वाहतूक साधन प्रदान करेल.
>
> – **डॉ. संजय मुखर्जी,** महानगर आयुक्त, एमएमआरडीए

> **शहरी वाहतूक प्रकल्पांसाठी एक मॉडेल**
>
> हा अभिनव प्रकल्प शहरातील आव्हानांसाठी प्रगत तंत्रज्ञान पर्याय स्वीकारण्याची आमची बांधिलकी दर्शवतो. पॉड टॅक्सी प्रणाली भारतात भविष्यातील शहरी वाहतूक प्रकल्पांसाठी एक मॉडेल म्हणून काम करेल, ज्यामुळे नागरिकांसाठी टिकाऊ आणि कार्यक्षम गतिशीलता सुनिश्चित होईल.
>
> – **एकनाथ शिंदे,** मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, एमएमआरडीए

# देवस्थानांच्या विकासासाठी २७५ कोटींचा निधी

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या रिद्धपूर, भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील आठ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.



**या देवस्थानांना दिला निधी**

- श्री संत गुलाबराव महाराज भक्तीधाम प्रल्हादपूर (२५ कोटी)
- शिवपार्वती तलाव, मौजे वडगणे जिल्हा कोल्हापूर (१४.९८ कोटी)
- श्री विठ्ठल मंदिर देवस्थान, धापेवाडा जिल्हा नागपूर (१६४.६२ कोटी)
- श्री संत सावता माळी तीर्थक्षेत्र, अरणला ‘अ’ वर्ग दर्जा देण्याचा निर्णय

‘‘या विकास आराखड्यांच्या यशस्वी अंमलबजावणीतून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाच्या पर्यटन विकासाला चालना मिळेल,’’ असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला आहे. राज्यातील ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्र, देवस्थान विकास शिखर समितीची बैठक गुरुवार, दि. ५ रोजी मंत्रालयात पार पडली. या बैठकीला मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, नियोजन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पर्यटन विभागाच्या प्रधान सचिव जयश्री भोज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

# उत्तर मुंबईतील विकास प्रकल्पांना मंत्री पीयूष गोयल यांनी दिला वेग

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

उत्तर मुंबईतील विकासात्मक प्रकल्पांना गती देण्यासाठी केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री तथा खा. पीयूष गोयल यांनी बुधवार, दि. ४ सप्टेंबर रोजी बोरिवली येथे व्यापक आढावा बैठक घेतली. या बैठकीत महापालिका, ‘म्हाडा’, ‘एसआरए’, ‘एमएमआरडीए’, क्रीडा अधिकारी आणि जिल्हा प्रशासनासह विविध संस्थांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते. यावेळी मंत्री गोयल यांनी सुरू असलेल्या प्रकल्पांना गती देण्यासाठी आणि निर्धारित मुदतीत ते पूर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्दे श दिले.

उत्तर मुंबईतील १९ विकास योजनांमध्ये पुनर्विकास, पायाभूत सुविधांची वाढ, नागरी सुविधा, वाहतूक व्यवस्थापन, सार्वजनिक सेवा, टोल प्लाझा, शहर सुशोभीकरण आणि प्रदूषण नियंत्रण यांसह विविध समस्यांचा समावेश आहे. महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपनगर जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर आणि ‘एसआरए’, ‘म्हाडा’चे इतर वरिष्ठ अधिकारी यांनी या बैठकीत विविध प्रकल्पांच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी आ. अतुल भातखळकर, आ. योगेश सागर, आ. मनीषा चौधरी, आ. सुनील राणे, आ. प्रकाश सुर्वे आदी मान्यवर उपस्थित होते. मंत्री गोयल यांनी अधिकाऱ्यांना मुदत निश्चित करताना सावधगिरी बाळगण्याचा इशारा दिला. ‘‘प्रकल्पातील गुंतागुंत मलाही समजते. कृपया मला फसवू नका. येत्या सणासुदीच्या काळात जनतेला त्रास देऊ नये,’’ अशा सूचना दिल्या.

# साधना विद्यालयात शिक्षक दिन समारोह उत्साहात संपन्न



**मुंबई** : शीव येथील ‘शिक्षण साधना मंडळा’च्या साधना विद्यालयात गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी संस्थेतर्फे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन समारोहाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ‘पद्मभूषण वसंतदादा पाटील प्रतिष्ठान’, मुंबईचे कॅम्पस संचालक अशोक चव्हाण यांनी उपस्थित शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. तसेच शाळेत २५ वर्षे सेवा पूर्ण झालेल्या शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी आणि इयत्ता दहावीत (विषयात) १०० टक्के गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या विषय शिक्षकांचा तसेच शाळेबाहेरील संस्थांकडून पुरस्कार प्राप्त केलेल्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाला ‘शिक्षण साधना मंडळा’चे सचिव चंद्रकांत खोपडे तसेच संस्थेच्या पूर्व प्राथमिक, प्राथमिक आणि माध्यमिक विभागातील मराठी व इंग्रजी माध्यमातील सर्व मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, तसेच शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी ‘शिक्षण साधना मंडळा’चे सचिव चंद्रकांत खोपडे यांनी ही शिक्षक दिनाचे औचित्य साधून उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या परब यांनी केले, तर शाळेच्या प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला भिलारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**(म्हाडाचा घटक)**

**ई-निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता (पूर्व) विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई– ४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकूण **०१** कामाकरीता **बी–१** (टक्केवारी) नमुन्यातील ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई–निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in, वर उपलब्ध असतील. **निविदा विक्री दिनांक ०६.०९.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक १३.०९.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत** राहील. निविदा सूचनेबाबत शुद्धिपत्रक/बदल असल्यास फक्त https://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं.झो.सु.मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

Follow us:@mhadaofficial

CPRO/A/661

म्हाडा–गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/–
**कार्यकारी अभियंता (पूर्व),**
**मुं.झो.सु.मंडळ, मुंबई**

**EPUJA SPIRITECH LIMITED**
(FORMERLY KNOWN AS SAGAR PRODUCTIONS LIMITED)
CIN: CIN:L93000MH1980PLC170432
**REDG. OFF. :** Marathon Icon 6th floor, Office no 606, Ganpatrao Kadam Marg, Lower Parel, Mumbai-400 013. Phone No. : 6263 879 732
E-mail :-splgrive@rediffmail.com ● Website: www.sagarproduction.com

**NOTICE OF 45TH AGM FOR EPUJA SPIRITECH LIMITED (FORMERLY KNOWN AS SAGAR PRODUCTIONS LIMITED) TO BE HELD THROUGH VIDEO CONFERENCING / OTHER AUDIO VISUAL MEANS.**

Notice is hereby given that the 45th (Forty Fifth) Annual General Meeting of the members of EPUJA SPIRITECH LIMITED (Formerly known as Sagar Productions Limited) will be held on Friday, 27th September, 2024, at 4:00 P.M. IST through video conferencing/other audio visual means (VC) to transact the businesses as set out in the AGM. The electronic copies of the Notice of AGM and Annual Report for F.Y. 2023-24 have been sent to all the members whose email Id are registered with the Company/Depository Participant(s) in accordance with the circulars issued by Ministry of Corporate Affairs. The same is also available on the Company's Website.

Members holding shares either in physical form or in dematerialized form, as on the cut-off date of Friday, September 20, 2024 may cast their vote electronically on the Ordinary Business and Special Business as set out in the Notice of AGM through electronic voting system of CDSL from a place other than venue of AGM ("remote e-voting").All the members are informed that:

• The Ordinary Business and Special Business as set out in the Notice of AGM may be transacted through voting by electronic means.

• The remote e-voting shall commence on Tuesday, September 24th, 2024 (9:00 a.m. IST). • The remote e-voting shall end on Thursday, September 26th, 2024 (5:00 p.m. IST)

•The cut-off date for determining the eligibility to vote by electronic means or at the AGM is Friday, September 20, 2024.

• The Register of Members and Share Transfer Books will remain closed from 20th September, 2024 to 27th September, 2024.

• Any person, who acquires shares of the Company and become member of the Company after dispatch of the Notice of AGM and holding shares as of the cut-off date i.e. Friday, September 20, 2024, may obtain the login ID and password by sending a request at following email id's: helpdesk.evoting@cdslindia.com or issuer/RTA.

**Members may note that:**

**(1)** The remote e-voting module shall be disabled by CDSL after the aforesaid date and time for voting and once the vote on a resolution is cast by the member, the member shall not be allowed to change it subsequently;

**(2)** The members who have cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again;

**(3)** A person whose name is recorded in the register of members or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut-off date shall be entitled to avail the facility of remote e-voting. The notice of AGM is available on the Company's website www.sagarproduction.com and also on the CDSL's website www.evotingindia.com; and in case of queries, members may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for members and e-voting user manual for members at the Downloads Section www.evotingindia.com, or email at helpdesk.evoting@cdslindia.com Tel: 1800-225-533 or contact Ms. Deeksha Tiwari, Company Secretary and Compliance Officer of the company, at splgrive@rediffmail.com, Contact No: 6263879732 who will also address grievances connected with the voting by electronics means.

**For, Epuja Spiritech Limited**
(Formerly known as Sagar Productions Limited)
Sd/-
**Deeksha Tiwari**
**Company Secretary and Compliance Officer**

Date : 05.09.2024
Place: Mumbai

# ‘आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार २०२३-२४’ची घोषणा



**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा दि. ५ सप्टेंबर हा जन्मदिवस. त्यामुळे हा दिवस ‘शिक्षक दिवस’ म्हणून साजरा केला जातो. त्यादिवसाचे औचित्य साधून मुंबई महानगरपालिकेकडून शिक्षण क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या शिक्षकांना ‘आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार’ जाहीर केले जातात. त्यानिमित्ताने ‘आदर्श शिक्षक महापौर पुरस्कार २०२३–२४’च्या पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे महापालिकेच्या उपआयुक्त (शिक्षण) चंदा जाधव यांनी गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी महापालिका मुख्यालयातील पत्रकार परिषदेत जाहीर केली. यावेळी महापालिकेचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजू तडवीदेखील उपस्थित होते.

महापालिका आयुक्त भूषण गगराणी आणि अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) डॉ. अमित सैनी यांच्या मार्गदर्शनात निर्धारित निकषांनुसार संबंधित समितीद्वारे आदर्श शिक्षक महापौर पुरस्कारार्थींची निवड करण्यात आली. यासाठी प्राथमिक व माध्यमिक शाळा, खासगी अनुदानित शाळा व विनाअनुदानित शाळांतील एकूण १५८ शिक्षकांच्या मुलाखती घेऊन त्यातून ५० आदर्श शिक्षकांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कारार्थींमध्ये २६ महिला शिक्षकांसह २४ पुरुष शिक्षकांचा समावेश आहे. तसेच पुरस्कारार्थींमध्ये मराठी माध्यमाचे दहा, इंग्रजी माध्यमाचे पाच, तसेच हिंदी आणि उर्दू माध्यमाचे प्रत्येकी सहा, गुजराथी भाषा एक, दाक्षिणात्य भाषा एक, विशेष शिक्षक चार, विशेष मुलांच्या शाळेतील एक शिक्षक, महानगरपालिका माध्यमिक शाळा चार, मान्यताप्राप्त खासगी अनुदानित व विनाअनुदानित १२ अशा एकूण ५० शिक्षकांची निवड करण्यात आली आहे.

> महाराष्ट्र राज्य शासनाकडून महापालिकेच्या शाळांमध्ये अध्यापन करणाऱ्या सहा शिक्षकांना ‘क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार’ प्रदान करण्यात आला आहेत. या सर्व शिक्षकांचा महापालिकेकडून सत्कार करण्यात आला. आदर्शवत कामगिरी करुन महानगरपालिकेच्या सर्व शाळांसमोर आदर्श उभे करणाऱ्या या सर्व शिक्षकांचा अभिमान असल्याचे गौरवोद्गार काढत महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे कौतुक केले.

**‘क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कारा’चे मानकरी**

- देवनार वसाहत इंग्रजी शाळा क्रमांक १ – सविता जगताप
- मढ मराठी मुंबई स्कूल – आशा ब्राम्हणे
- मुंबई पब्लिक स्कूल, मालाड–पूर्वा संख्ये
- संत कंकय्या हिंदी शाळा – रवींद्र पाटील
- पंतनगर महानगरपालिका इंग्रजी शाळा – नीता जाधव (शारीरिक शिक्षण शिक्षिका)

**‘थोर समाजसुधारक क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार’**

- गोरेगाव (पूर्व) महानगरपालिका माध्यमिक विद्यालय – गौरी शिंदे

# राज्य कौशल्य विद्यापीठ हे रोजगाराचे नवे दालन : मंत्री लोढा

## आदर्श शिक्षक, फेलोशिप प्राप्त विद्यार्थी आणि विविध संस्थाचा सत्कार

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

‘‘महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कौशल्य विकसित केले जात आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होत आहेत. हे या विद्यापीठाचे यश आहे,’’ असे प्रतिपादन कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा यांनी गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी व्यक्त केले.



‘वर्ल्ड ट्रेड सेंटर’ येथे कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठामार्फत शिक्षक दिनानिमित्त गुरूवंदना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात मंत्री लोढा बोलत होते. यावेळी महाराष्ट्र कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र राज्य नाविन्यता सोसायटीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विकास नाईक, अतिरिक्त आयुक्त अनिल सोनावणे, ‘वर्ल्ड ट्रेड सेंटर’चे चेअरमन विजय कलंत्री, रजिस्टार राजेंद्र तलवारे, ‘अमृत योजने’चे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यावेळी उपस्थित होते.

लोढा म्हणाले की, ‘‘महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरू या आदर्श गुरू आहेत. नुकत्याच झालेल्या जळगाव येथील कार्यक्रमात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉ. अपूर्वा पालकर यांच्या कार्याचा उल्लेख केला आहे. आजच्या काळात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी कुशल मनुष्यबळाची आवश्यकता आहे. सरकारी क्षेत्रात रोजगाराच्या मर्यादित संधी उपलब्ध आहेत. तर खासगी क्षेत्रांमध्ये विकसित कौशल्याची आवश्यकता असते. विद्यापीठ आणि खासगी संस्थामध्ये समन्वय उत्तमरित्या साधला जात आहे, त्यामुळे रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होत आहेत. कौशल्य विद्यापीठाचे काम उत्तमरित्या होत आहे. जे विद्यार्थी कौशल्य विद्यापीठामधून शिकून पुढे जाणार आहेत, त्या सर्वांना मी हेच सांगेन, आतापासूनच स्टार्ट अपसाठी पुढील संधीचा विचार आणि आखणी करायला लागा. काळानुरूप कौशल्य विकसित करा.’’

> **सामंजस्य करार**
>
> महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाशी संबंधित कौशल मित्रा, संचीती हेल्थकेअर अकॅडमी, झुडियो, मॅकडोनाल्ड, वर्ल्ड ट्रेड सेंटर यांच्या प्रतिनिधींचा या समारंभ सत्कार करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्य वृद्धीसाठी कार्यरत असलेल्या अमर सक्सेना, आदिती काळे, भूपेंद्र कौर, सुनील जोशी, प्रतिक नार्वेकर व वसुधा जाधव या शिक्षकांचा कार्यक्रमात सत्कार करण्यात आला. ‘अमृत उद्योगिकता विकास योजनें’तर्गत निवडक १५ स्टार्ट अपला प्रत्येकी तीन लाख रुपये विद्यावेतन पत्र यावेळी वितरित केले गेले. नरवाडे कट्यालिस्ट, कॅश फ्री मेट्रो, माय बोर्ड यांच्यासोबत महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ यांनी सामंजस्य करार केले.

# निःक्षारीकरण प्रकल्पासाठी राबवलेली निविदाप्रक्रिया रद्द

**मुंबई, दि. ५ : प्रतिनिधी**

मुंबईला वाढत्या पाण्याची गरज लक्षात घेऊन महापालिकेकडून मनोरी येथे समुद्राचे खारे पाणी गोडे करणारा निःक्षारीकरण प्रकल्प उभारला जाणार होता. यासाठी महापालिकेने डिसेंबर २०२३ मध्ये निविदाप्रक्रिया राबवली होती. मात्र नऊ महिने होऊनही कोणताच प्रतिसाद न मिळाल्याने पालिकेने निविदाप्रक्रिया रद्द केली आहे. ज्यामुळे हा प्रकल्प कसा उभा राहणार, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.


सात धरणांतून मुंबईला दररोज ३ हजार, ८०० दशलक्ष लिटर इतका पाणीपुरवठा केला जातो. परंतु, धरणक्षेत्रात पुरेसा पाऊस न पडल्यास मुंबईकरांना दहा ते १५ टक्के पाणीकपातीला सामोरे जावे लागते. त्यामुळे पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन पालिकेने ‘महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळा’च्या १२ हेक्टर जागेवर निःक्षारीकरण प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला होता.

या प्रकलपासाठी सल्लागार नेमून अहवाल तयार करण्यात आला होता. त्यानुसार या प्रकल्पासाठी ३ हजार, ५२० कोटींचा खर्च येणार होता. चार वर्षांत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट पालिकेने ठेवले होते. परंतु, पालिकेच्या निविदाप्रक्रियेला फक्त एकानेच प्रतिसाद दिल्याने पुरेशा प्रतिसादाअभावी पालिकेने निविदाप्रक्रिया रद्द केली आहे.

# शिक्षक दिनानिमित्त आरोग्य शिबीर

**मुंबई, दि. ५ : विशेष प्रतिनिधी**

‘देव देश प्रतिष्ठान’, ‘छबी सहयोग फाऊंडेशन’ आणि ‘आरोग्य भारती’ यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन शालेय संकुल, घाटकोपर येथे शिक्षक दिनाचे औचित्य साधून गुरुवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० ते दुपारी २ या वेळेत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. संकुलातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सर्वांगीण आरोग्याचे परीक्षण या शिबिराद्वारे करण्यात आले. हा उपक्रम फक्त तपासणीपुरता मर्यादित नव्हता, तर शिक्षकांना निरोगी राहण्यासाठी प्रेरित करण्याचे ध्येय होते. त्यामुळे ‘शिक्षक स्वस्थ तर भारत सशक्त’ हा संदेश या उपक्रमातून अधोरेखित करण्यात आला.



या शिबिराचे उद्दिष्ट शिक्षकांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करून त्यांची आरोग्य स्थिती सुधारण्यास मदत करणे आणि त्यामुळे विद्यार्थी सशक्त होण्याच्या दिशेने योगदान देणे असे होते. शिबिरामध्ये आरोग्य, नेत्र, दंत आणि रक्तपासणी करून शिक्षकांना निरोगी जीवनशैलीविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

‘‘शिक्षक स्वस्थ असतील, तरच ते विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण देऊ शकतात. या आरोग्य शिबिराद्वारे शिक्षकांना त्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याबद्दल जागरूक करणे हा महत्त्वपूर्ण उद्देश आहे,’’ असे प्रतिपादन शिबिराचे उद्घाटक कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे यांनी केले.

‘आरोग्य भारती’ कोकण प्रांताचे उपाध्यक्ष डॉ. निलेश सिंघानिया यांनी उपस्थितांना ‘आरोग्य भारती’ची भूमिका व कार्य सर्वांसमोर मांडले.

‘देव देश प्रतिष्ठान’चे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ‘देव देश प्रतिष्ठान’, ‘छबी सहयोग फाऊंडेशन’ आणि ‘आरोग्य भारती’ यांच्या सर्व टीमने शिबिराचे नियोजन केले. या शिबिरात १८५ (स्त्रिया–१०५ आणि पुरुष–८०) शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने सर्वांच्या आरोग्य तपासण्या केल्या. तसेच त्यांना निरोगी आरोग्य टिकवण्यासाठी विविध उपाय सुचवले.